# मिरा भाईंदर महानगरपालिका

**आयुक्त यांचे कार्यालय**

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


MiraBhayandar @2047
Innovate, Connect, Prosper

जा.क्र. मनपा/आयुक्त/ 106 /2023-24 दि. 18 /03/2024

## // कार्यालयीन आदेश //

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कामकाज हे पूर्णत: ई-ऑफीस प्रणालीमार्फत सुरु असुन सर्व अधिकारी व कर्मचारी हे आपले वैयक्तिक E-mail ID व Password वापरुन नस्त्या, प्रस्ताव, देयके व इतर शासकीय कामकाज ई-ऑफीसद्वारे करीत आहेत.

प्रशासकीय कामकाजात गतिमानता आणण्यासाठी ई-ऑफीस प्रणाली कार्यान्वित केलेली असल्यामुळे महानगरपालिकेची कामे तात्काळ होण्यासाठी महापालिकेचे अधिकारी किंवा कर्मचारी नैमित्तिक रजेवर (किरकोळ रजा) असतील व त्यांचा पदभार अन्य अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांकडे दिलेला नसेल तरी त्यांना जेथे असतील तेथून आपल्या लॅपटॉप, संगणक, आयपॅड किंवा टॅबचा वापर करुन महानगरपालिकेचे दैनंदिन कामकाज कार्यालयीन वेळेनंतर देखील करता येईल. तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी देखील ई-ऑफीस प्रणालीद्वारे मुख्यालयात उपस्थित न राहता कार्यालयीन कामकाज करता येईल.

तसेच महापालिकेचे अधिकारी किंवा कर्मचारी हे अर्जित रजा किंवा किरकोळ रजेवर असतील व त्यांच्या पदाचा कार्यभार अन्य अधिकारी किंवा कर्मचाऱ्याकडे सोपविला असेल अशावेळी मात्र त्यांना ई-ऑफीसद्वारे काम करता येणार नाही याची सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी.

**(संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.))**
**आयुक्त तथा प्रशासक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत-**

1) सर्व खातेप्रमुख/ विभागप्रमुख
2) संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी
3) स्थळप्रत